महाराष्ट्र शासन

सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग

सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, नंदूरबार

यांचे कार्यालय, भुवनेश्वर कॉलनी, कोरीट रोड, नंदूरबार 425412

e-mail : ar_nbr@rediffmail.com दुरध्वनी :- (02564) 232218

---

जा.क्र. आस्था/ क.77 अ/स्व.मदनभाई फबासं/प्रा. अ.नियुक्ती/आदेश/सन 2017 दिनांक :- 13/07/2017

वाचावे :- 1) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1690 चे कलम 77 अ मधील तरतुदी

2) या कार्यालयाचे पत्र दिनांक 20/03/2017

ज्या अर्थी, स्व. मदनभाई लक्ष्मणभाई फळबागायतदार सहकारी संघ मर्यादित नंदुरबार ता. जि. नंदुरबार या संस्थेची संचालक मंडळाची मुदत दिनांक 01/07/2017 रोजी संपलेली आहे.

ज्या अर्थी, संस्थेने महाराष्ट्र सहकारी संस्था (निवडणुक) नियम 2014 मधील नियम 6 व 9 ला अनुसरुन संस्थेच्या तात्पुरत्या मतदार यादया तयार करण्यास कसुर केला आहे.

ज्या अर्थी, वाचावे क्रमांक 1 मधील तरतुद खालील प्रमाणे आहे. कलम 77 अ समितीच्या सदस्यांची नियुक्ती, नवीन समिती, समितीची घटना करीत असलेवेळी कोणत्याही सदस्य निवडून न येणे व नवीन समितीने पदभार न स्विकारणे या वेळी प्राधिकृत अधिकां-याची नियुक्ती कलम 77 अ (1) (1) (अ) (अ) नुसार कोणत्याही संस्थेच्या समितीची प्रथम रचना करण्यात आली. त्यावेळी समितीचे सर्व किंवा कोणतेही सदस्य निवडण्यात कसुर झाली आहे अशी तरतुद आहे. तसेच कलम 77 अ (1) (फ) (दोन) मधील तरतुद नवीन समिती पदग्रहण करीतो पर्यत संस्थेचे कामकाज पाहण्यासाठी संस्थेचे तीनपेक्षा अधिक सदस्य मिळुन बनलेली समिती किंवा एक किंवा अधिक प्राधिकृत अधिकारी नेमता येतील. हे संस्थेचे तीनपेक्षा अधिक सदस्य मिळुन बनलेली समिती किंवा एक किंवा अधिक प्राधिकृत अधिकारी नेमता येतील हे संस्थेचे सदस्य असणे आवश्यक असणार नाही. परंतु असा आदेश काढण्यापूर्वी निबंधकाने, संस्थेच्या मुख्य कार्यालयातील सुचना फलकावर प्रस्तावित आदेशाच्या संबधातील हरकती व सुचना नोटीशीत विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या आंत मागविण्याची नोटीस लावली पाहीजे आणि त्या कालावधीत त्यांच्याकडे आलेल्या सर्व हरकती व सुचना यावर विचार केला पाहीजे.

मात्र आणखी असे की, त्वरीत कार्यवाही करणे आवश्यक आहे किंवा अशी नोटीस प्रसिध्द करणे, व्यवहारीरत्या व्यवहार्य नाही. या बददल निबंधकाची खात्री होईल अशा कोणत्याही प्रकरणी, अशी नोटीस प्रसिध्द करणे आवश्यक असणार नाही.

परंतु तसेच की, संस्थेच्या कोणताही सदस्य किंवा कोणतेही सदस्य अशा समितीवर काम करण्यास इच्छुक नसतील तर, संस्थेच्या कारभारावर देखरेख ठेवण्यासाठी निबंधकाला योग्य वाटेल त्याप्रमाणे, संस्थेच्या सदस्य नसेल अशा एक किंवा अधिक प्राधिकृत अधिका-याची नेमणुक करणे हे निबंधकासाठी कायदेशीर असेल अशी तरतुद आहे.

ज्या अर्थी, स्व. मदनभाई लक्ष्मणभाई फळबागायतदार सहकारी संघ मर्यादित नंदुरबार ता. जि. नंदुरबार या संस्थेने निवडणुक घेणेकामी संस्थेच्या प्रारुप मतदार याद्या तयार करुन या कार्यालयास सादर केलेल्या नाहीत. सबब, संस्थेने समितीची संचालक मंडळाची मुदत संपल्यानंतर नवीन संचालक मंडळाची रचना होणेसाठी

निवडणुक कामकाजात जाणीवपुर्वक कसुर करुन संस्थेच्या तात्पुरत्या मतदार याद्या तयार करुन सादर करण्यास हेतुत विलंब केला आहे. व संस्थेस उपरोक्त क्रमांक 2 अन्वये लेखी समज देवूनही संस्थेने अशा याद्या अद्याप तयार करुन सादर केलेल्या नाहीत.

त्या अर्थी, स्व. मदनभाई लक्ष्मणभाई फळबागायतदार सहकारी संघ मर्यादित नंदुरबार ता. जि. नंदुरबार या संस्थेवर प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करणे आवश्यक व क्रमप्राप्त असल्याची माझी खात्री झाल्याने मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

-: आदेश :-

मी निरज चौधरी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, नंदुरबार ता. जि. नंदुरबार मला महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 77 अ चे प्राप्त अधिकारानुसार मी असा आदेश देतो की, स्व. मदनभाई लक्ष्मणभाई फळबागायतदार सहकारी संघ मर्यादित नंदुरबार ता. जि. नंदुरबार या संस्थेवर प्राधिकृत अधिकारी म्हणुन श्री. बी. एल. साबळे, उपलेखापरिक्षक, अधिन जिल्हा विशेष लेखा परिक्षक, वर्ग-1 सहकारी संस्था, नंदुरबार यांची नियुक्ती करीत आहे. प्राधिकृत अधिकारी यांनी विधी सुसंगत व कलम 77 - अ मधील (2) (3) नुसार आणि संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करावी.

सदरचा आदेश आज दिनांक 13/07/2017 रोजी माझ्या स्वाक्षरीनीशी व कार्यालयीन मुद्रा ठसवुन दिला असे.

( निरज चौधरी )
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, नंदुरबार.

ठिकाण :- नंदुरबार
दिनांक :- 13/07/2017

प्रति,

1. बी. एल. साबळे, उपलेखापरिक्षक, सहकारी संस्था, नंदुरबार
   2/- त्यांना कळविण्यात येते की, प्राधिकृत अधिकारी म्हणुन आपण पदभार ग्रहण करुन 77 अ (2) (3) नुसार व विधी सुसंगत कार्यवाही करणेची दक्षता घ्यावी.व तसे केल्याचा वेळोवेळी अहवाल या कार्यालयास सादर करावा.
2. म. चेअरमन / सचिव, स्व. मदनभाई लक्ष्मणभाई फळबागायतदार सहकारी संघ मर्यादित नंदुरबार
3. शाखाधिकारी, धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.धुळे शाखा - स्टेशन रोड, नंदुरबार.
4. विभागीय अधिकारी, धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.धुळे विभाग नंदुरबार.
5. लेखापरिक्षक, सहकारी संस्था, नंदुरबार.
6. मा.व्यवस्थापक, येरवडा मध्यवर्ती कारागृह मुद्रणालय, पुणे- 6

2/- त्यांना विनंती की, सदरचा आदेश शासनाच्या येत्या राजपत्रात प्रसिध्द करुन त्याच्या चार प्रती पाठवाव्यात.

<u>प्रत सविनय सादर.</u>

1. मा. जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नंदुरबार.
2. मा. जिल्हा विशेष लेखापरिक्षक, वर्ग 1, सहकारी संस्था, नंदुरबार ता. जि. नंदुरबार

सहाय्यक निबंधक
सहकारी संस्था, नंदुरबार